DISTRICT AND SESSIONS COURT, NAGPUR.

Subject: **To display the advertisement dated 22/06/2026 for preparation of Select List of 2 candidates for the post of "Sweeper" on the establishment of Original Side, High Court of Bombay.**

Endt.No.B-16(1)/3524/2026 Date: 25 June, 2026.

Submitted for information to :

1. District System Administrator Computer Section, District Court, Nagpur.
   (He is directed to Circulate the Copy of Letter alongwith Notice through Winbee and email to all staff members of District & Sessions Court, Nagpur & all Taluka Courts and **to publish the same on the website of District Court, Nagpur.**

2. The Head Bailiff attached to the Hon'ble Civil Judge, Sr. Dn., Nagpur, to display the Advertisement on the Notice Board of District Court, Nagpur.

I/C. Registrar
District Court, Nagpur.

Most Urgent..... To display the Advertisement dated 23.06.2026 for the post of of Sweeper..... **mahnagdc** < mahnagdc@mhstate.nic.in >

Received on 24/06/26
IW No. 6739/26

Samita Gadkari < insp-bgen@bhc.gov.in >
Tue, 23 Jun 2026 5:48:50 PM +0530

To "The Principal District Judge Ahmednagar"<mahahmdc@nic.in>,"ahmdccomp"<ahmdccomp@gmail.com>,"DISTRICT AND SESSIONS COURT AKOLA"<mahakodc@mhstate.nic.in>,"District Court"<mahamrdc@mhstate.nic.in>,"DC Aurangabad" <mahaurdc@mhstate.nic.in>,"DIST. COURT BEED"<mahbeedc@mhstate.nic.in>,"District and Sessions Court, Bhandara" <mahbhadc@mhstate.nic.in>,"District Court Buldana"<mahbuldc@mhstate.nic.in>,"District Court Chandrapur" <mahchadc@mhstate.nic.in>,"District Court Dhule"<mahdhudc@mhstate.nic.in>,"dcddhule" <dcddhule@rediffmail.com>,"District Court Gadchiroli"<mahgaddc@mhstate.nic.in>,"District and Sessions Court Gondia" <dj.gondia-mah@indianjudiciary.gov.in>,"Hingoli"<mah.hindc@indiancourts.nic.in>,"District Court Jalgaon" <mahjagdc@mhstate.nic.in>,"District Session Court Jalna DC Jalna"<mahjaldc@mhstate.nic.in>,"District Court Kolhapur" <mahkoldc@mhstate.nic.in>,"District And Sessions Court Latur"<mahlatdc@mhstate.nic.in>,"DISTRICT SESSIONS COURT Nagpur"<mahnagdc@mhstate.nic.in>,"District Court Nanded"<mahnandc@mhstate.nic.in>,"District Court Nandurbar" <mahdhunansc@indianjudiciary.gov.in>,"DC NASHIK COURT"<mahnasdc@mhstate.nic.in>,"District Court Osmanabad" <mahosmdc@mhstate.nic.in>,"DC Parbhani"<mahpardc@mhstate.nic.in>,"District Court Pune" <mahpundc@mhstate.nic.in>,"District Court Raigad Alibag"<mahraidc@mhstate.nic.in>,"District Court Ratnagiri" <mahratdc@mhstate.nic.in>,"District Court Sangli"<mahsandc@mhstate.nic.in>,"District Court Satara" <mahsatdc@mhstate.nic.in>,"Principal District Judge Principal District Judge"<mahsindc@mhstate.nic.in>,"District And Sessions Court Solapur"<mahshodc@nic.in>,"District Court Thane"<mahthadc@mhstate.nic.in>,"District Court Wardha" <mahwardc@mhstate.nic.in>,"Principal District & Sessions Judge, Washim Washim" <mahakowassc@indianjudiciary.gov.in>,"District Court Yavatmal"<mahyavdc@mhstate.nic.in>,"CITY CIVIL AND SESSIONS COURT MUMBAI"<ctcourt-mum@nic.in>,"CJM Court"<chief.mm1@gmail.com>,"CJM Court, Esplanade Court, Mahapalika Marg Mumbai Mumbai"<cmm-mum.mh@bhc.gov.in>,"Small Cause"<smallcausecourt@yahoo.com>,"Family Court Mumbai" <fc-bhc@nic.in>,"Family Court Aurangabad"<fcaurangabad.mah@bhc.gov.in>,"Family Court Akola" <mahakofcsc@indianjudiciary.gov.in>,"FC Nagpur"<pjfc_nagpur@yahoo.com>,"Family Court Nagpur Family Court Nagpur" <fcnagpur@bhc.gov.in>,"Family Court Thane"<fc.thane-mh@gov.in>,"FC Amravati"<familyamt@gmail.com>,"Pradeep Chore"<fcamravati.mah@bhc.gov.in>,"Family Court Nashik"<fc-nashik@bhc.gov.in>,"FC Solapur" <solfamilycourt@gmail.com>,"Family Court Solapur"<fcsolapur@bhc.gov.in>,"FC Nanded" <familycourtnanded@gmail.com>,"Family Court Nanded"<nanfamily@bhc.gov.in>,"Family Court Pune" <mahpunefc@aij.gov.in>,"FC Kolhapur"<DDO.4564FCKOP@gmail.com>,"Rajaram Pondkule" <fc.kolhapur@bhc.gov.in>,"FC Latur"<familycourtlatur@gmail.com>,"FAMILY COURT LATUR" <familycourtlatur@bhc.gov.in>,"FC Buldana"<familycourtbld@gmail.com>,"Judge Family Court Buldana"<fc-buldana@bhc.gov.in>,"FC Ahmednagar"<ahmfamilycourt@gmail.com>,"Judge, Family Court, Ahmednagar" <fcahmednagar.mah@bhc.gov.in>,"FC Osmanabad"<fcosmanabad@gmail.com>,"Family Court Osmanabad" <fcosmanabad.mah@bhc.gov.in>,"Family Court Dhule"<fcdhule.mah@bhc.gov.in>,"FC Jalgaon" <fcjalgaon@gmail.com>,"FC Jalna"<familycourtjalna@gmail.com>,"Family Court Jalna"<familycourtjalna@bhc.gov.in>,"FC Satara"<familycourtsatara@gmail.com>,"Family Court Satara"<fc-satara@bhc.gov.in>,"FC Sangli" <familycourtsangli@gmail.com>,"FC Beed"<familycourtbeed@gmail.com>,"Family Court Beed"<fcbeed@bhc.gov.in>,"FC Bhandara"<familycourtbhandara@gmail.com>,"Shuddhodhan Morey"<fcbhandara@bhc.gov.in>,"FC Parbhani" <fcparbhani@gmail.com>,"Family Court Parbhani"<fc-parbhani@bhc.gov.in>,"Family Court Yavatmal" <fcyavatmal@bhc.gov.in>,"Family Court Raigad Alibag"<fc-alibag@bhc.gov.in>,"FC Belapur" <familycourtbelapur@gmail.com>,"Id Court"<icmum@mtnl.net.in>,"registrarindustrialcourt" <registrarindustrialcourt@yahoo.in>,"Mahesh Tonpe"<ic-mumbai@bhc.gov.in>,"Mumbai"<pmscacmum1@gmail.com>,"mact Mumbai"<mactmumbai1@gmail.com>,"Geeta Ekawade"<mact-mumbai@bhc.gov.in>,"AMOGH KALOTI"<cc.mum-mh@gov.in>

Cc "Pay and Establishment Department Original Side"<pay-os@bhc.gov.in>

Please see the attachment.

Regards,

Section Officer,
B(Gen) Section,
High Court, A.S.,
Bombay.

2 Attachment(s)

Sweeper Advertisment dt. 22.6...
584.4 KB

All HOD display Sweeper advt....
36.2 KB

Shri-Advocate to attend
IC P-D.J.-
24-6-26

MOST URGENT
By e-mail

Tel. : **22673569 (0) Extn. 1367**
E-mail : **insp-bgen@bhc.gov.in**
No. : **B(Gen)-5601/57/2026/955**
Date : **23 June, 2026.**

From :

Smt. A.B. Sharma
Registrar (Inspection-I),
High Court (Appellate Side),
Bombay.

To,

1. **All the Principal District and Sessions Judges.**
2. **The Principal Judge, City Civil and Sessions Court, Mumbai.**
3. **The Chief Judge, Court of Small Causes, Mumbai.**
4. **The Chief Judicial Magistrate, Mumbai.**
5. **All the Principal Judge/Judge, Family Courts.**
6. **The President, Industrial and Labour Court, Mumbai.**
7. **The President, Maharashtra State Co-op. Appellate Court, Mumbai.**
8. **The Chairman, Motor Accident Claim Tribunal, Mumbai.**
9. **The Charity Commissioner, Mumbai.**

Subject : To display the advertisement dated 22/06/2026 for preparation of Select List of 2 candidates for the post of "Sweeper" on the establishment of Original Side, High Court of Bombay.

Respected Sir/Madam,

Apropos the above subject, an advertisment dated 22/06/2026 for preparation of Select List of 2 candidates for the post of "Sweeper" on the establishment of Original Side, High Court of Bombay alongwith instructions is forwarded, with a request to display the same on 22/06/2026 on Notice Board of your respective courts.

Yours faithfully,

23/06/2026
Registrar (Inspection-I)

Encl. : As above.

*****

Endt. No. : B(Gen)-5601/57/2026/ 956

Copy forwarded with compliments to the Registrar, Original Side, High Court of Bombay, for information.

High Court of Bombay :
Date : 23 June, 2026. :

23/06/2026
Registrar (Inspection-I)

नियुक्त्या
मुंबई येथील उच्च न्यायालयायचा न्यायाधिकार

मुंबई उच्च न्यायालयाच्या मूळ शाखेच्या आस्थापनेवर खाली नमूद केलेल्या पदाकरिता उमेदवारांची निवड यादी तयार करण्यासाठी जाहिरात प्रसिद्धीच्या दिनांकास पात्रता धारण करणाऱ्या उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

पदाचे नाव	एकूण रिक्त पदे	पुढील २ वर्षात रिक्त होणारी पदे	दिव्यांगासाठी आरक्षित पदे (४%)	निवड यादी	नियमाप्रमाणे "सफाई कामगार" या पदासाठी वेतन श्रेणीमधील वेतन स्तर
सफाई कामगार	२	--	**निरंक**	२	एस-३ : १६६००-५२४०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय भत्ते

निरोगी, इच्छुक व पात्र उमेदवारांनी त्यांचे अर्ज जाहिरातीच्या **खंड 'इ'** मध्ये नमूद केलेली आवश्यक कागदपत्रे / प्रमाणपत्रे / डिमांड ड्राफ्ट इत्यादीसह **परिशिष्ट - अ** मधील नमुन्यानुसार, **दिनांक ११ जुलै २०२६** रोजी किंवा त्या आधी पोहचेल या बेताने खालील पत्यावर **फक्त स्पीड पोस्टाद्वारे (Speed Post)** पाठवावेत :-

मा. प्रबंधक, मूळ शाखा, उच्च न्यायालय, मुंबई
वेतन व आस्थापना विभाग, दुसरा मजला,
P.W.D. इमारत, फोर्ट, मुंबई- ४०००३२

स्पीड पोस्टाव्यतिरिक्त इतर कोणत्याही माध्यमातुन किंवा वरील नमूद केलेल्या दिनांकानंतर मिळालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. उपरोक्त अर्ज/कागदपत्रे इत्यादी समाविष्ट असलेल्या लिफाफ्यावर **"सफाई कामगार पदासाठी अर्ज"** असे लिहावे.

सदर प्रक्रिये दरम्यान घेतल्या जाणाऱ्या प्रात्यक्षिक परीक्षा, शारीरिक क्षमता चाचणी आणि मुलाखतीसाठी उमेदवारास स्वखर्चाने हजर रहावे लागेल. नियुक्ती व अल्पसुचीचे (shortlisting) सर्व अधिकार प्रशासन, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई यांनी स्वतःकडे राखून ठेवले आहेत.

सफाई कामगार हे एकाकी पद (Isolated Post) असून, सदर पदास भविष्यात पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नाहीत यांची उमेदवाराने नोंद घ्यावी.

अ) पात्रता

१. **उमेदवार भारताचा नागरिक असावा.**

२. **शैक्षणिक अर्हता:-**

- उमेदवार किमान सातवी इयत्ता उत्तीर्ण असावा.
- उमेदवारास मराठी व हिंदी भाषा लिहिता, वाचता व बोलता येणे आवश्यक आहे.

३. **अनुभव:-**

- उमेदवाराला शौचालय व स्नानगृह स्वच्छतेचा, झाडू कामाचा तसेच कार्यालय परिसर स्वच्छतेचा पुरेसा अनुभव असावा.

४. **वयोमर्यादा:-**

प्रवर्ग	किमान वयोमर्यादा	कमाल वयोमर्यादा
खुला	१८ वर्षे	३८ वर्षे
मागासवर्गीय	१८ वर्षे	४३ वर्षे
न्यायालयीन किंवा शासकीय कर्मचारी	१८ वर्षे	लागू नाही

ब) पात्र उमेदवारीकरिताच्या अटी

१. त्याचे / तिचे चारित्र्य आणि वर्तणूक चांगली असावी.

२. तो / ती करार करणेस सक्षम असावा / असावी.

३. त्याला / तिला एम. पी. एस. सी. / यु. पी. एस. सी. किंवा कोणत्याही राज्य सेवा आयोगाने त्यांच्याद्वारे आयोजित केलेल्या परीक्षा निवडींमध्ये उपस्थित राहण्यापासून कायमचे काढून टाकलेले नसावे किंवा अपात्र ठरवलेले नसावे.

४. त्याला / तिला नैतिक पतनाच्या गुन्ह्यासाठी दोषी ठरवण्यात आलेले नसावे किंवा त्याला / तिला फौजदारी न्यायालयाने दोषी ठरवलेले नसावे किंवा त्याच्या / तिच्या विरुद्ध फौजदारी खटला प्रलंबित नसावा.

५. न्यायालयीन कर्मचारी किंवा शासकीय कर्मचारी यांच्यावर कोणतीही विभागीय चौकशी प्रलंबित नसावी.

६. त्याने / तिने प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे त्याच्या / तिच्या उमेदवारीसाठी निवड समिती किंवा तिच्या सदस्यांवर कोणत्याही प्रकारे दबाव टाकण्याचा प्रयत्न केलेला नसावा.

७. त्याला / तिला हयात असलेल्या पत्नी / पती ची संख्या एकापेक्षा जास्त नसावी.

८. महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम, २००५ नुसार, उमेदवारास अर्ज करण्याच्या दिनांकास, २८ मार्च २००६ व तदनंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे, हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक नसावी.

क) अर्ज भरण्याचे शुल्क

१. सदर भरती प्रकियेसाठी अर्ज शुल्क रुपये १,०००/- (रुपये एक हजार मात्र) (सर्व प्रवर्गांसाठी) एवढे असेल.

२. अर्ज शुल्क हे "BOMBAY HIGH COURT ORIGINAL SIDE" यांच्या नावे काढलेला रुपये १,०००/- (रुपये एक हजार मात्र) चा डिमांड ड्राफ्ट (Demand Draft) स्वरूपात सादर करावे.

३. अर्ज शुल्क भरल्याशिवाय अर्जदारांचे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

४. अर्ज शुल्क ना-परतावा (non-refundable) असेल.

ड) निवड प्रकिया

आलेल्या अर्जाची छाननी केल्यानंतर अल्प सूची (short list) प्रमाणे पात्र उमेदवारांना खालील निवड प्रक्रियेस सामोरे जावे लागेल.

अ. क्र.	मूल्यांकन पद्धती	गुण
१	प्रात्यक्षिक परीक्षा (किमान पात्रता गुण - १५)	३०
२	शारीरिक क्षमता चाचणी	१०
३	वैयक्तिक मुलाखत	१०
निवड प्रक्रियेचे एकूण गुण		५०

सूचना: १. प्रात्यक्षिक चाचणीत अनुत्तीर्ण झालेले उमेदवार उर्वरित प्रकियेसाठी अपात्र ठरतील.

२. वरील सर्व परीक्षांसाठीचे वेळापत्रक मुंबई उच्च न्यायालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिद्ध करण्यात येईल.

इ) उमेदवारांनी अर्जासोबत खालील कागदपत्रांच्या स्वतः प्रमाणित (Self-attested) केलेल्या छायांकित प्रती सादर कराव्यात

१. जन्मतारखेच्या पुराव्याचा दाखला (शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र / जन्म प्रमाणपत्र / एस. एस. सी. चे बोर्ड प्रमाणपत्र (School Leaving Certificate/Birth Certificate issued by Competent Authority / Board Certificate of SSC)

२. शैक्षणिक पात्रतेच्या परीक्षेचे गुणपत्रक आणि प्रमाणपत्र (७ वी, १० वी, १२ वी किंवा कोणत्याही मान्यता प्राप्त विद्यापीठातून घेतलेली पदवी, इत्यादी)

३. शौचालय व स्नानगृह स्वच्छतेचा, झाडू कामाचा तसेच कार्यालय परिसर स्वच्छतेचा पूर्वानुभव असल्यास त्या संबंधीचा दाखला.

४. जाहिरात प्रसिद्धी नंतरची तारीख असलेली दोन प्रतिष्ठित व्यक्तींनी दिलेले चारित्र्य संपन्नतेविषयीचे प्रमाणपत्र. (त्यांचा पत्ता व फोन नंबर सह) (परिशिष्ट ब)

५. लहान कुटुंबाबाबत स्वयं घोषणापत्र. (परिशिष्ट क)

६. सक्षम अधिकाऱ्याने प्रदान केलेला जातीचा दाखला. (केवळ मागासवर्गीयांसाठी)

७. महाराष्ट्राचे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate)

८. उमेदवार शासकीय कर्मचारी असल्यास, त्याच्या कार्यालयाचे ना-हरकत प्रमाणपत्र.

९. विवाहित महिला उमेदवाराच्या बाबतीत जर तिने लग्नानंतर तिचे नाव बदलेले असेल तर तिच्या नावाच्या बदलाबाबत दस्तऐवज उदाहरणार्थ शासकीय राजपत्र, सक्षम प्राधिकरणाने जारी केलेल्या विवाह प्रमाणपत्राची प्रत इत्यादी.

१०. "BOMBAY HIGH COURT ORIGINAL SIDE" यांच्या नावे काढलेला रुपये १,०००/- (रुपये एक हजार मात्र) चा डिमांड ड्राफ्ट (Demand Draft).

११. संबंधीत इतर आवश्यक कागदपत्रे अर्जामध्ये दिलेल्या माहितीसह.

१२. न्यायालय प्रशासनाने मागणी केल्यास इतर कोणतेही दस्तऐवज सादर करणे अनिवार्य आहे.

फ) उमेदवारांना असेही सूचित करण्यात येते की

१. अर्ज विहित नमुन्यातच सादर करावा (जाहिरातीसोबत दिलेल्या परिशिष्ट 'अ' नमुन्यात)

२. अर्जातील संपूर्ण माहिती अचूक भरणे उमेदवारास बंधनकारक आहे

३. उमेदवाराने अर्ज भरताना संपूर्ण नाव, पत्ता, मोबाईल नंबर, ई-मेल आयडी (E-mail), जन्म तारीख त्यांच्याजवळ उपलब्ध असलेल्या वैध कागदपत्रानुसार अचूक रित्या नमूद करावे.

४. उमेदवाराने त्याच्या शैक्षणिक कागदपत्रांच्या आधारे अर्जात अचूक शैक्षणिक माहिती भरावी. शैक्षणिक पात्रतेबाबत माहिती भरताना उमेदवाराने त्याची / तिची पात्रता खाली दिलेल्या क्रमानुसार नमूद करावी.

१. ७ वी

२. १० वी

३. १२ वी किंवा कोणत्याही मान्यता प्राप्त बोर्ड किंवा विदयापीठातून प्राप्त केलेली पदवी.

५. काही शाळांच्या गुणपत्रिका टक्केवारीऐवजी ग्रेडच्या स्वरूपात दिल्या जातात. या प्रकरणात, उमेदवारांनी ऑफलाईन अर्ज भरण्यापूर्वी विषयनिहाय मिळालेले गुण, एकूण गुण आणि टक्केवारी असलेले गुणपत्रक संबंधीत शाळेकडून मिळवावे आणि ते गुण उपरोक्त रकान्यात दिलेल्या सूचनेनुसार भरावे. सदर गुणपत्रक अर्जासोबत पाठवावे.

६. उमेदवारा विरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल / प्रलंबित असल्यास किंवा पूर्वी एखाद्या प्रकरणात फौजदारी न्यायालयाने शिक्षा ठोठावली असल्यास त्याबाबत सविस्तर माहिती भरावी. तसेच न्यायालयीन कर्मचारी किंवा शासकीय कर्मचारी यांच्यावर कोणतीही विभागीय चौकशी प्रलंबित असल्यास त्याबाबत सविस्तर माहिती भरावी.

७. उमेदवाराने डिमांड ड्राफ्ट नंबर आणि त्याचा दिनांक अर्जात अचूकपणे नमूद करावा.

८. अर्ज शुल्क केवळ डिमांड ड्राफ्ट स्वरूपात स्वीकारले जाईल; डिमांड ड्राफ्ट व्यतिरिक्त इतर कुठल्याही पद्धतीने केलेल्या अर्ज शुल्काचा विचार केला जाणार नाही आणि तो अर्ज नाकारला जाईल.

९. उमेदवाराने एकापेक्षा जास्त अर्ज सादर केल्यास शुल्कासह त्याचा / तिचा शेवटचा अर्ज विचारात घेतला जाईल.

१०. मुलाखतीसाठी बोलावण्यात येणाऱ्या उमेदवारांनी अर्ज सादर करतेवेळी दाखल केलेल्या कागदपत्रांच्या मुळ प्रती पडताळणीसाठी सोबत आणाव्यात.

११. उमेदवाराने जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे पात्रता आणि निकष पूर्ण केले असतील तरच अर्ज स्वीकारला जाईल

१२. सदरहु पदे जशी जशी रिक्त होतील त्यानुसार नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात येतील. निवड झालेल्या उमेदवारांनी पदस्थापनेबाबत / स्थळाबाबत कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास किंवा पदस्थापनेबाबत विनंती केल्यास त्याची निवड रद्द करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

ग) उमेदवारांकरिता इतर आवश्यक सूचना :-

१. **जाहिरातीला अनुसरून प्राप्त झालेल्या अर्जाच्या संख्येनुसार व उमेदवाराची शैक्षणिक पात्रता व त्यातील गुणवत्ता तसेच शौचालय व स्नानगृह स्वच्छतेचा, झाडू कामाचा व कार्यालय परिसर स्वच्छतेच्या पुरेशा अनुभवानुसार अल्पसुची करण्याचे सर्व अधिकार प्रशासन, उच्च न्यायालय, मुंबई यांनी स्वतःकडे राखून ठेवले आहेत.**

२. **भरती प्रकिया कोणत्याही वैध कारणामुळे रद्द झाल्यास त्याबाबत अर्जदाराला कोणताही दावा करता येणार नाही. परीक्षेचा प्रकार, परीक्षा स्थगित करणे व रद्द करणे, अंशतः बदल करणे, याबाबत सर्व अधिकार प्रशासन, उच्च न्यायालय, मुंबई, यांनी स्वतःकडे राखून ठेवले आहेत. याबाबत कोणालाही कोणत्याही प्रकारचा दावा करता येणार नाही.**

३. निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी अर्जदाराने अर्जात दिलेली माहिती खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी नियुक्ती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल अथवा नियुक्त झाल्यास त्याला / तिला पदावरून काढून टाकण्यात येईल.

४. अल्पसुचित समाविष्ट उमेदवार / अर्जदार जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या पात्रता व अटी शर्तीनुसार पात्र आहे असे समजून त्याला प्रात्यक्षिक परीक्षेकरिता तात्पुरता प्रवेश देण्यात येईल. मुलाखती / नियुक्ती पूर्वी उमेदवाराची जाहिरातीनुसार पात्रता तपासण्यात येईल. त्यावेळी उमेदवार अपात्र आढळल्यास नियुक्ती करण्यात येणार नाही. याची सर्वस्वी जबाबदारी उमेदवाराची राहील.

५. केवळ अर्ज दाखल केला यावरून मुलाखतीचा किंवा नेमणूकीचा हक्क मागता येणार नाही. तसेच उमेदवाराची उच्च शैक्षणिक पात्रता हाच सदर पदाच्या निवडीसाठी मुख्य आधार मानला जाणार नाही.

६. उच्च न्यायालयाच्या नियंत्रणाबाहेरील कोणत्याही अनपेक्षित घटनेमुळे भरती प्रक्रियेचे वेळापत्रक बदलू शकते असा बदल वेळोवेळी मुंबई उच्च न्यायालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध केला जाईल. त्याकरिता उमेदवारांनी अधिकृत संकेतस्थळास वेळोवेळी भेट द्यावी.

७. उमेदवाराला कोणत्याही बदलाबाबतची सूचना उशीरा मिळाल्यामुळे नियोजित तारखेस व वेळेस प्रात्यक्षिक परीक्षा, शारीरिक चाचणी व मुलाखतीस उमेदवार अनुपस्थित राहिल्यास, उच्च न्यायालय प्रशासनाकडून या बाबत कोणतीही तक्रार / दावा विचारात घेतला जाणार नाही किंवा ऐकला जाणार नाही.

८. उमेदवाराने सफाई कामाची प्रात्यक्षिक परीक्षा तसेच शारीरिक क्षमता चाचणी मध्ये मिळविलेल्या गुणांच्या आधारे तसेच त्याच्या अर्जाची छाननी व त्याने मुलाखतीच्या वेळेस सादर केलेल्या कागदपत्रांची पडताळणी केल्यानंतर उमेदवाराची मुलाखतीची पात्रता अंतिमरित्या गुणवत्तेच्या आधारवर ठरविण्यात येईल.

९. पात्र उमेदवारांना प्रात्यक्षिक परीक्षा, शारिरीक क्षमता चाचणी, तसेच मुलाखतीसाठी नियोजित तारखांना स्व:खर्चाने हजर रहावे लागेल.

१०. प्रात्यक्षिक परीक्षा तसेच मुलाखतीसाठी बोलावण्यात येणाऱ्या उमेदवारांनी स्वतःचे मूळ फोटो प्रमाणपत्र (Photo ID) उदाहरणार्थ मतदार कार्ड, पॅन कार्ड, आधार कार्ड, वाहन परवाना यापैकी कोणताही एक पुरावा आणावा.

११. उमेदवाराने निवड समितीच्या सदस्यांना किंवा उच्च न्यायालयात काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना, कर्मचाऱ्यांना भेटण्याचा किंवा त्याच्या निवड प्रकियेसंबंधी व्यक्तीश: अथवा इतर कोणामार्फत दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास त्याला / तिला निवड प्रकियेमधून अपात्र ठरविण्यात येईल व त्यासंबंधी निवड समितीचा निर्णय अंतिम राहील.

१२. निवड यादीतील उमेदवार नियुक्ती आदेशात नमूद केलेल्या कालावधीत कर्तव्यात सामील होऊ शकला नाही तर त्याचे / तिचे नाव निवड यादीतून काढून टाकले जाईल.

१३. निवड यादीतील उमेदवारांची नियुक्ती सुरुवातीला दोन वर्षांच्या परिविक्षाधीन कालावधीसाठी असेल. परिविक्षाधीन कालावधी समाधानकारक पूर्ण झाल्याबद्दल कार्यालयीन आदेश जारी होईपर्यंत नियुक्तीच्या सेवा कोणत्याही वेळी, कोणतीही नोटीस न देता किंवा कोणतेही कारण न देता समाप्त केल्या जातील.

१४. उमेदवारांची निवड ही प्रात्यक्षिक परीक्षा, शारीरिक चाचणी व मुलाखतीत मिळालेल्या गुणांच्या आधारे केली जाईल.

१५. या निवड प्रक्रियेत निवड समितीने घेतलेला निर्णय हा अंतिम असेल.

आदेशावरून

महाप्रबंधक
मुंबई येथील उच्च न्यायालयाचा न्यायाधिकार

दिनांक: २२ जून २०२६

परिशिष्ट 'अ'

मुंबई उच्च न्यायालय, मूळ शाखा

मुंबई

अलीकडे काढण्यात आलेला उमेदवाराचा पासपोर्ट साईजचा फोटो

प्रति,
माननीय प्रबंधक,
मूळ शाखा, उच्च न्यायालय,
मुंबई - ४०००३२.

विषय : "सफाई कामगार" पदाकरिता अर्ज

मा. महोदय,

विनंतीपूर्वक अर्ज सादर करतो की, मी सफाई कामगार या पदावर आपल्या कार्यालयात काम करण्यास इच्छुक असून माझी तपशीलवार माहिती खालीलप्रमाणे देत आहे.

१.	उमेदवाराचे संपूर्ण नाव	
२.	पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता (पिनकोड सह)	
३.	राष्ट्रीयत्व	
४.	उमेदवार महाराष्ट्राचा अधिवासी आहे काय ?	होय / नाही
५.	दूरध्वनी / मोबाईल क्रमांक	

६.	ई-मेल ID	
७.	लिंग (स्त्री / पुरुष / इतर)	
८.	धर्म	
९.	जात व प्रवर्ग	
१०.	जन्म दिनांक	
११.	जाहिरात प्रसिद्धीच्या तारखेस उमेदवाराचे वय	_____वर्षे _____महिने _____ दिवस
१२.	उमेदवाराची वैवाहिक स्थिती (अविवाहित /विवाहित/ घटस्फोटित/विधवा/ विधुर)	
१३.	हयात असलेल्या मुलांची संख्या	
१४.	२८/०३/२००५ नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या (असल्यास जन्मदिनांक नमूद करावा)	
१५.	उमेदवार दिव्यांग आहे काय?	होय / नाही

१६. शैक्षणिक अर्हता :-

अ. क्र.	शैक्षणिक अर्हता	परीक्षा मंडळाचे नाव	उत्तीर्ण वर्ष	एकूण गुण	प्राप्त गुण	टक्केवारी

१७. **सफाई कामाचा अनुभव :-**

अ. क्र.	अनुभव (संबंधित कार्यालयाचे नाव व पत्ता)	कालावधी		एकूण (वर्ष, महिने व दिवस)
		दिनांकापासून	दिनांकापर्यंत	

१८.	इतर विशेष / अतिरिक्त अर्हता	
१९.	ज्ञात भाषा	
२०.	**शासकीय कार्यालयात कार्यरत असल्यास:**	
	अ) कार्यालयाचे नाव	
	ब) धारण केलेले पद	
	क) नियुक्ती दिनांक	
	ड) अर्ज करताना सदर कार्यालयाद्वारे ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त केले आहे का?	
२१.	सफाई कामगार पदासाठी अर्ज करण्याकरिता आवश्यक असलेल्या शुल्काच्या डिमांड ड्राफ्ट (Demand Draft) ची माहिती	क्रमांक:- दिनांक:- शुल्क रुपये:-

२२.	उमेदवाराविरुद्ध कोणतीही फौजदारी / कार्यवाही प्रलंबित आहे का? (असल्यास माहिती जोडावी)	होय / नाही
२३.	उमेदवारास न्यायालयाने दोषी ठरवले आहे का? (असल्यास माहिती जोडावी)	होय / नाही
२४.	उमेदवाराविरुद्ध (शासकीय कार्यालय त कार्यरत असल्यास) शिस्तभंगाची चौकशी सु आहे का? (असल्यास माहिती जोडावी)	होय / नाही
२५.	कोणत्याही न्यायालय / एम.पी.एस.सी. / यु.पी. एस.सी. किंवा कोणत्याही राज्य लोकसेवा आयोगाने त्यांच्याद्वारे आयोजित केलेल्या परीक्षा प्रकियेत उपस्थित राहण्यापासून कायमस्वरूपी किंवा काही कालावधीसाठी बाद केले आहे का? (असल्यास माहिती जोडावी)	होय / नाही

मी, प्रतिज्ञापूर्वक जाहीर करतो की, वरील नमूद केलेली माहिती अचूक तसेच जाणीवपूर्वक दिली असून परिपूर्ण सत्य आहे. वरील माहिती खोटी व चुकीची आढळल्यास माझी उमदेवारी नियुक्तीच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल आणि माझ्या विरुद्ध कायदेशीर कारवाई होईल याची मला जाणीव आहे.

दिनांक :

ठिकाण :

उमेदवाराची स्वाक्षरी व नाव

उमेदवाराने अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांची यादी खालील अनुक्रमांकानुसार लिहावी.

१. _____

२. _____

३. _____

४. _____

५. _____

६. _____

७. _____

८. _____

९. _____

१०. _____

११. _____

१२. _____

१३. _____

१४. _____

परिशिष्ट 'ब'

चारित्र्य (वर्तणूक) प्रमाणपत्र

[प्रतिष्ठित व्यक्तींनी दिलेले चारित्र्य संपन्नतेविषयीचे प्रमाणपत्र]

प्रमाणित करण्यात येते की, श्री / श्रीमती / कु. _____

हे _____तालुका _____जिल्हा _____येथील रहिवासी असून, मी त्यांना मागील _____वर्षांपासून ओळखतो / ओळखते, त्यांची वर्तणूक व चारित्र्य चांगले आहे. ते माझे नातेवाईक नाहीत.

करिता सदरील चारित्र्य (वर्तणूक) प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

ठिकाण :- .....

दिनांक :- .....

<u>प्रमाणपत्र देणाऱ्याची सही, नाव व हुद्दा</u>

सही :- .....

नाव :- .....

हुद्दा :- .....
शिक्का / रबरी शिक्का
(Seal/Rubber Stamp)

पत्ता :- .....

.....

.....

भ्रमणध्वनी क्रमांक :- .....

परिशिष्ट 'क'

प्रतिज्ञापत्र

मी, श्री / श्रीमती / कु. .....

श्री / श्रीमती .....यांचा मुलगा / मुलगी / पती / पत्नी, वय ..... वर्ष, राहणार ..... याद्वारे पुढील प्रमाणे जाहीर करतो / करते की,

१) मी **सफाई कामगार** या पदासाठी माझा अर्ज सादर केला आहे.

२) आज रोजी मला .....(संख्या) इतकी मुले आहेत. यापैकी दिनांक २८ मार्च २००५ नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या .....आहे. (जन्मदिनांक नमूद करावा)

३) मला जाणीव आहे की सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासनाद्वारे जारी करण्यात आलेल्या दिनांक २८ मार्च, २००५ च्या अधिसूचनेनुसार, हयात असलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च २००६ नंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे ह्या पदासाठी मी अपात्र होईन.

४) मी असेही जाहीर करतो / करते की, माझ्या विरुध्द कोणताही फौजदारी गुन्हा दाखल नाही किंवा मला फौजदारी न्यायालयाने शिक्षा ठोठावली नाही किंवा माझ्या विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही झालेली नाही.

५) या जाहिरातीत नमूद केलेल्या सर्व सूचना व अटी मला मान्य आहेत.

उमेदवाराची स्वाक्षरी व नाव

ठिकाण:-

दिनांक:-